निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/२२/२०१५/ 1302 दिनांक- १४.०१.२०१६

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/२२/२०१५

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री. शरदचंद्र प्रेमदास वासनिक<br>रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्ड,<br>वरठी, ता.मोहाडी, जि. भंडारा. |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | ०३.०८.२०१५ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | ०४.०९.२०१५ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | ०२.१२.२०१५ |

**मागितलेली माहिती**

As per section ६१ E.A. act

१. शासनाने मे. सनफ्लॅग कंपनीला कोणत्या नियमानुसार विजेवर १००% सुट व स्टॅम्प ड्युटीवर सुट देण्यात आली. त्या बाबतीत संपूर्ण माहितीचे कागजाद

२. मे. सनफ्लॅग कंपनी व्यवस्थापनाने विजेची सुट घेण्यापूर्वी आपल्या आयोगाचे शर्ती-अटी पूर्ण केले आहे. असे कागदोपत्री आपल्या आयोगास पाठवलेली माहितीच्या सत्यप्रत कॉपी देण्यात यावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर**

As per section ८४ E.A. act

१. आयोगाच्या कार्यालयाशी संबंधीत नाही.

२. मागितलेली माहिती असंबंधीत असल्याने याबाबत आयोगाच्या कार्यालयात कोणतेही दस्तावेज उपलब्ध नाहीत.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण-**

मौजा वरठी/ एकलारी मे. सनफ्लॅग कंपनी जि. भंडारा यांना शासनाकडुन विज शुल्क आकारणीवर सुट मिळाली आहे. परंतु सन २००७ ते सन २०१४ पर्यंत एकुण किती रुपये सुट मिळाली आहे हि माहिती मागण्याकरीता अर्ज केले होते. आणि मागीतलेली माहिती अर्जदारास पुरवुन समाधान करने हे बंधनकारक आहे. तेव्हा अर्जदाराच्या दि.०३/०८/२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत)-

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. १२.०१.२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी यांनी त्यांचा अपील अर्जात मुंबई ला सुनावणी करिता येणे शक्य होणार नाही असे कळविले होते व त्यांनी त्यांचे या कार्यालयाला प्राप्त पत्र दिनांक ११.०१.२०१६ च्या पत्रानुसार सुनावणीस येण्याची असमर्थता दर्शवली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले.

माहिती अधिकाराच्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहिती अधिकाराचा अर्ज माहिती अधिकारी यांना दि. ३.८.२०१५ रोजी प्राप्त झालेला असून त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०९.२०१५ रोजी अपिलार्थी यांना उत्तर/माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील हे दि.०२.१२.२०१५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झालेले आहे यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार/अपिलार्थी यांनी अपील हि मुदती नंतर दाखल केली आहे.

वरील अपीलावर दि.१२.०१.२०१६ रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असे माहिती अधिकारी सांगीतले. करिता माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचे या कार्यालयाला प्राप्त पत्र दिनांक ११.०१.२०१६ चे निवेदन ग्राह्य धरुन व अपिलातील उपस्थित मुददे व मागीतलेली माहिती या सर्व बाबींवर विचार करुन वरिल अपील ही गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ ला माहिती न मिळाल्याचे महटले आहे व ज्याचेशी सबंधित आहे त्या कडे वर्ग केले नाही असे नमूद केले आहे. मुद्दा क्रमांक २ ला माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे, तरी सुद्धा या उपरही , अपिलाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना माहिती देण्यात येते कि, म.वि. नि. आ. हे वीजदर निश्चित करते व आयोगाला विजेची सुट देण्याचे अधिकार नाही. करिता या कार्यालयात त्या सबंधित माहिती अथवा कागदपत्रे उपलब्द नाहीत.
माहित अधिकार कायद्या अंतर्गत अपिलार्थी यांनी अपील दिरंगाई माफी चा अर्ज केला नाही, अपील मुदित नाही, व माहिती अर्ज निकाली काढल्यानंतर . स्वतंत्र पत्र लिहून चूक कळविणे किवा असे वाचावे असे म्हणणे अशी तरतूद नाही. करिता अपिलार्थी यांना माहिती पाहिजे असेल तर या विभागाला पुनः अर्ज करावे, किवा सबंधित विभागाला अर्ज करावे. अपील मुदित नसल्याकारणाने अपिलार्थी यांचे अर्ज ज्या विभागासी सबंधित आहे त्यांना मुदूत गेल्यानंतर, माहिती अधिकारी यांनी अर्ज वर्ग करणे करिता आदेश पारित करण्यात येत नाही. करिता सदरहु अपिल निकाली काढण्यात येत आहेत.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)
उपसंचालक (विधी) तथा
प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना माहितीसाठी.